# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०१/०२/२०१९ रोजी (का.प.क्र.२१) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक ०१/०२/२०१९ रोजी (का.प.क्र.२१) मा.सभापती श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:५५ वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त, श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
०३. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट
०४. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
०५. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०६. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे
०७. स.स.श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे
०८. स.स.श्री.पुनमचंद सोनाजी बमणे
०९. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
१०. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
११. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
१२. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
१३. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

श्री.गजानन बारवाल : रस्त्याचे संरक्षण मंत्री मा.जॉज फर्नांडिंस यांचे दुखःद निधन झाले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.
(जो श्रध्दांजलीचा प्रस्ताव मांडला त्यास श्रीमती.स्वाती नागरे, शिल्पाराणी वाडकर, राखी देसरडा, श्री.अब्दुल नविद, सिध्दांत शिरसाट अनुमोदन देतात.)

मा.सभापती : जो श्रध्दांजलीचा प्रस्ताव ठेवण्यात आला त्यास दोन मी. उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.
(यावेळी स्व.जॉज फर्नांडिंस यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्रीमती शिल्पाराणी वाडकर : वार्ड क्र.२८ मध्ये २६ जानेवारीला ओल्या कचऱ्यामध्ये एका महिला नागरीकाची तीन तोळ्याची सोन्याची चेन हरवली होती. प्रामाणिक पणे कर्मचाऱ्यांनी ती शोधुन दिली. त्या कर्मचाऱ्याचे सभागृहात अभिनंदन करण्यात यावे. आणि त्यांचा चार महिन्याचा थकीत पगार भेट स्वरुपात म्हणुन त्यांना देण्यात यावा.

मा.सभापती : त्या कर्मचाऱ्याचे अभिनंदन केले पाहिजे. आणि पगाराच्या बाबतीत तीन चार महिने कर्मचाऱ्यांचा पगार थांबायला नको ताबडतोब त्यांचा पगार करण्यात यावा.

श्रीमती जयश्री कुलकर्णी : बऱ्याच बैठकीपासुन अशोक नगर, शिवनेरी कॉलनीत दुषित पाण्याच्या बाबत अजुन सुध्दा प्रश्न सोडवण्यात आलेला नाही. त्रिमुर्ती चौकातले शौचालय सुध्दा सुरू करण्यात आलेले नाही.

कार्य.अभियंता(पा.पु) : कंटेम्नेशनचे काम आजच सुरू केले आहे. काही अडचण असेल तर बघुन घेतो.

श्रीमती.जयश्री कुलकर्णी : त्रिमुर्ती चौक भागात पाणी व कचऱ्याचा प्रश्न निर्माण झाला. कार्यवाही होत नाही.

उपअभियंता(पा.पु) : प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्यात येईल.

श्रीमती.स्वाती नागरे : टिव्ही सेंटर मार्ग येथे सिटी बस देण्यात आलेली नाही. कालच नवीन बस आल्या आहेत. आमच्या भागामध्ये सुध्दा बस सुरू करण्यात यावी.

कक्ष प्रमुख(तांत्रिक) : बसच्या बाबतीत श्री.कवडे साहेब बघतात याबाबत त्यांना कळवतो.

श्रीमती.राखी देसरडा : जायकवाडी ते फारोळा आणि फारोळा ते नक्षत्रवाडी अशी पाणी पंपींग करतो. त्यामध्ये एक ते दिड वर्षापासुन फिल्डर बसवण्याकरिता पैसे दिलेले आहे. अजुनही तिथे फिल्डर लावण्यात आलेले नाही. विज पुरवठा कमी झाला तर शहरामध्ये पाणी येण्यासाठी पाच ते सहा तास लागते. यामुळे तीन दिवसाआड येणारे पाणी चार दिवसावर जाते.

कार्य.अभियंता(पा.पु) : पंधरा दिवसामध्ये बसवण्याचे नियोजन आहे. त्यासाठी परत शट्‌टाऊन घ्यावे लागणार आहे.

श्री.गजानन बारवाल : नऊ वेळेस शट टाऊन झाले आहे. इतका उशिर का होत आहे.

मा.सभापती : एमएसईबीचे जे बाकीचे कामे आहेत ते आधी करुन घेतले पाहिजे. तसेच मेन्टनंस जी कामे असेल तीही करावी. पाच सहा तासाचे शट टाऊन घेऊन ते संपवले पाहिजे.

श्री.गजानन बारवाल : उप मुख्य लेखापरिक्षक यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. त्याची माहिती देण्यात यावी. त्यांना त्यांच्या जागेवर रुजु होण्यासाठी आदेशित करण्यात आले होते. का रुजु होत नाही.

मा.अति.आयुक्त : सकाळीच शोकास काढली आहे आणि २४ तासाच्या आत त्यांना हजर होण्याचे सांगितले आहे.

मा.सभापती : रुजु होण्यासाठी त्यांना स्पष्टपणे आदेशित करण्यात आले होते ते प्रशासनाचे ऐकत नाहीत का? नसेल ऐकत तर त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. उपमुख्य लेखा परिक्षक व मुख्य लेखाधीकारी या पदावर कसे काम करणार आहे. आजच्या आज यामध्ये निर्णय घेण्यात यावा.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : अतिक्रमण वाढले आणि कारवाई शुन्य अशी वृत्तपत्रामध्ये बातमी आहे. अतिक्रमण व नगर रचना विभाग सलगन केले तरी ही कार्यवाही होत नाही. प्रत्येक वेळेस अतिक्रमण आणि पार्किंगच्या बाबतीत बोलत असते त्यावर काहीच कार्यवाही करण्यात येत नाही.

कार्य.अभियंता(न.र) : दि.०५.०२.२०१९ पर्यंत डेड लाईन दिली या कुठे कुठे पार्किंग आहेत त्याचा अहवाल आल्यावर कार्यवाही करणार आहोत.

मा.सभापती : अहवाल आल्या नंतर कार्यवाही करावी.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : पार्किंग बद्दल धोरण ठरवण्यासाठी मा.कोर्टाने सहा आठवड्याचा कालावधी दिलेला होता. याबाबतीत समिती सुध्दा स्थापन झालेली होती. पुढे समितीने काय धोरण ठरवले. माहिती द्यावी. ८ तारखेला मा.कोर्टात तारीख आहे. मनपाचे तेथे म्हणणे माडावे.

मा.अति.आयुक्त : समितीच्या अहवालानुसार धोरण ठरवण्यासाठी फाईल मा.आयुक्तांकडे पाठवण्यात आलेली आहे. सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव दिला जाईल.

श्री.गजानन बारवाल : सिध्दार्थ गार्डनला लागुन जे पार्किंग आहेत. त्यांचे कॉन्ट्रॅक्ट कालावधी केव्हा पर्यंत आहेत त्याची माहिती देण्यात यावी.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : पार्किंगच्या बाबतीत कुठलाच समाधान कारक खुलासा होत नाही.

मा.सभापती : पाच तारखेपर्यंत वेळ दिलेला आहे सगळ्या वार्डचा अहवाल देणार आहे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : अभय योजनेच्या आणि होर्डिंगच्या बाबतीत माहिती मागितली होती ती सुध्दा मिळालेली नाही.

मा.सभापती : होर्डिंगच्या बाबतीत अभय योजना राबवली होती. त्याची सविस्तर माहिती आज सदस्यांना देण्यात यावी.

श्री.ऋषिकेश खैरे : वार्डामध्ये जे पाण्याचे टॅंकर येत होते ते आता बंद झाले आहे. त्यांचे पैसे देण्यात आलेले नाही.टॅंकरवाल्याचे पैसे देण्यात यावे जेणे करुन नागरीकांना पाण्याची अडचण येणार नाही.

मा.सभापती : टॅंकर वाल्यांचे पैसे देऊन लवकरात लवकर टॅंकर सुरु करण्यात यावे.

श्रीमती.सायरा बानो : जिल्हाधिकारी ते चंपाचौक मार्गे जाणाऱ्या व्हीआयपी रस्ता बनवण्यात आला आहे. रस्त्यावर एक सुध्दा लाईट लावण्यात आलेले नाही. शुक्लेश्वर मंदीर आहे समोर लाईट बंद आहे.

कार्य.अभियंता(विद्युत) : लाईट लावण्याचे काम चालु आहे. आजच वार्डामध्ये जाऊन बघुन घेतो.

मा.सभापती : लाईच्या मेंन्टेन्सचे काय झाले? इंजिनिअर कॉलेजला पाठवणार होते त्याचे सुचनेनुसार त्या रस्त्यातील लाईट चेक करावे.

कार्य.अभियंता(विद्युत) : मेंन्टेन्सच्याबाबतीत सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये नवीन फिटींग लावणे, मेंन्टेन्स करणे, कोणत्या कंपनीला देणे असा विस्तारित प्रस्ताव आहे.

श्री.अब्दुल नविद : माझ्या वार्डात एलईडी चे लाईट बंद आहे. वेळेच काम करीत नाही.

मा.सभापती : सुचना विचारात घ्यावी तेथील काम करावे. काय निर्णय घ्यायचा आहे ते अतिरिक्त आयुक्तांसोबत बसुन करण्यात यावे.

श्रीमती.शेख नरगीस : कट कट गेट येथील पुलाचे काम दोन वर्षापासुन चालु आहे. त्या ठिकाणी अपघात होत आहे, जवळ दवाखाना सुध्दा आहे. काम बंद करुन ठेवले आहे.

वार्ड अधिकारी : ठेकेदाराचे बिल थकीत असल्यामुळे काम बंद आहे. आरए बील सुध्दा दिले नाही.

मा.सभापती : पुर्ण काम केल्यावरच पैसे द्यायला पाहिजे. जो कोणी कॉन्ट्रॅक्ट असेल त्याला ब्लॅकलिस्ट करण्यात यावे.

मा.अति.आयुक्त : याबाबत मा.आयुक्तांशी चर्चा झालेली आहे. श्री.काझी यांना पॅचवर्कच्या कामाच्या बाबत परवानगी दिलेली आहे.

वार्ड अधिकारी : कालच पॅचवर्क वाल्यांना नोटीस दिलेली आहे.

मा.सभापती : आज किंवा उद्या मध्ये काम चालु करावे.

श्रीमती.शेख नरगीस : के.जी.एन हॉस्पिटलचे काम सुध्दा पेंटींग पडलेले आहे. तिथे मॅनपावर नाही, मशिन नाही. काहीच काम होत नाही.

वैद्यकिय अधिकारी : मॅनपावरची संचिका आर्थिक तपासणी साठी लेखा विभागाकडे पाठवलेली आहे.

मा.सभापती : आजच्या आज मशिन आणि मॅनपावरची व्यवस्था करुन देण्यात यावे. संचिका मान्य करावी.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : ठेकेदारांचे आर्धे बिल तरी देण्यात यावे जेणे करुन ते वार्डातले काम सुरु करतील.

श्रीमती.सत्यभामा शिंदे : यामध्ये कर वसुली वाढवली पाहिजे.

मा.अति.आयुक्त : मा.आयुक्तांनी यामध्ये धोरण ठरवलेले आहे. देखभाल आणि दुरुस्तीच्या कामांचे बिल देण्यात येत आहे.

मा.सभापती : कॉन्ट्रॅक्टरांना विश्वासात घेणे गरजेचे आहे. योग्य ते नियोजन केले पाहिजे.

श्री.अब्दुल नविद : वार्ड क्र.५० मध्ये चार महिन्यापासुन पाण्याची लाईन टाकण्यात आली आहे. फक्त वाल टाकणे बाकी आहे.

कार्य.अभियंता(पा.पु) : श्री.खाजा यांच्या संबंधीत विषय आहे. याबाबत सुचना करतो.

मा.सभापती : वाल बसवण्याचे लवकरात लवकर सांगण्यात यावे.

श्री.पुनमचंद बमणे : दोन महिन्यापासुन हर्सुल येथील हरसिध्दीमाता देवी या गल्लीला पाणी नाही. तिथे लाईन चौकप झाली आहे. आता पर्यंत दुरुस्ती करण्यात आली नाही. वसुली करावी आम्ही बरोबर आहे.

कार्य.अभियंता(पा.पु) : श्री.पदमे यांच्याकडे हे काम दिलेले आहे.

मा.सभापती : कॉन्ट्रॅक्टरांचे थोडे पेमेंट देण्यात आले आहे. त्यांना ताबडतोब काम करण्यास सांगावे.

श्रीमती.सत्यभामा शिंदे : महानगरपालिकेने दहा दिवसासाठी फोर व्हिलर गाड्या उचलुन नेण्याची मोहिम राबवली होती. यामध्ये चालु आणि बंद या दोन्ही गाड्या नेण्यात आल्या आहे. नागरीकांना पुर्वसुचना देखील देण्यात आलेली नाही. त्यांना त्यांच्या चालू गाड्या देण्यात याव्या.

मा.अति.आयुक्त : यामध्ये ४०० ते ४५० गाड्या उचलुन आणलेल्या आहे. जप्त झालेल्या गाड्या आरटीओ कडे देण्यात आल्या आहेत. नागरीकांना आरटीओकडुन त्या घ्यावेत. ज्या खराब गाड्या त्यावर दंड लावुन कार्यवाही होते. आरटीओ मध्ये दंड भरावा लागेल.

मा.सभापती : याबाबतीत पेपरच्या माध्यमातुन जाहीर प्रकटन देण्यात यावे की, नियमाप्रमाणे ज्या गाड्या जप्त झाल्या आहेत त्याची फाईन भरुन आरटीओ मधुन घेऊन जावे.

श्री.सिध्दांत शिरसाट : बीडबाय पास अतिक्रमण बाबत मागच्या बैठकीत बोललो होतो. सांगण्यात आले होते की,पोलिस स्टेशनला बंदोबस्तसाठी पत्र दिले होते.अशी खोटी माहिती देण्यात आली आहे.

कार्य.अभियंता(अति.) : बीडबाय पासवरील सर्व्हिस रोडवरील जे अतिक्रमण आहेत ते काढण्यासाठी निर्णय घ्यायचा आहे. रस्त्याची शहानिशा झाल्यावर पुढची कार्यवाही करता येईल.

श्री.सिध्दांत शिरसाट : डिपी रोडवरील अतिक्रमण अजुनही काढण्यात आलेले नाही.

कार्य.अभियंता(अति.) : डिपी रोडवरील काही टप्पऱ्या काढण्यात आल्या आहे. ज्या नवीन बसल्याअसतील त्या काढण्यात येईल.

मा.सभापती : परत हा विषय यायला नको ताबडतोब काढुन घेण्यात यावे.

श्री.गजानन बारवाल : सोनोग्राफी बाबत श्रीमती.पाडळकर मॅडम यांनी अतिशय चांगली कार्यवाही केली आहे. कशा प्रकारे कारवाई करण्यात आली? याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

वैद्यकिय अधिकारी : २१ तारखेला तक्रार प्राप्त झाली होती. उस्मानपुऱ्यातील एका घरामध्ये अवैध रित्या सोनोग्राफी होते आणि गर्भलिंग निदान करुन दिले जाते. त्याच दिवशी एक टिम तयार केली आणि मा.आयुक्तांची मंजुरी घेतली. टिम मधील कोणालाच याबाबत कल्पना दिलेली नव्हती. फक्त सांगण्यात आले होते की, एका ठिकाणी जाऊन रेड मारायची आहे. यामध्ये दोन मेडिकल ऑफिसर, दोन कर्मचारी, मनपाचे दोन महिला, दोन पुरुष पोलिस होते आणि तक्रारदार. आम्ही सर्वांनी मिळुन तो सापळा रचला. तिथे जाऊन सर्वांनी आप आपली पोजिशन घेऊन उभे होते. थोड्याच वेळाने तिथे गाडीतुन एका महिलेला आणण्यात आले. गाडीतुन आलेली महिला आणि तो एजन्ट त्या घरामध्ये गेल्यावर लगेचच आपली टीम तिथे गेली. मा.महापौरांकडे बैठक असल्यामुळे मला जाता आले नाही. परंतु सुचना दिल्या होत्या की, असे काही अढळले तर त्वरित फोन करा. कारवाई करण्यासाठी ॲप्रोपेट अधिकारी म्हणुन मिसीपिएनटीटी कायद्या अंतर्गत अधिकार दिले होते. संपुर्ण टिम त्या घरामध्ये जाऊन विचार पुस करत असतांना सुरुवातीला उडवा उडवीचे उत्तरे देण्यात आले. शोधा-शोध केल्यावर तिथे अलमारीवर मशिन आढळली आणि ती चालु स्थितीत होती. नुकताच त्या महिलेची सोनोग्राफी करण्यात आलेले होती. महिलेला विचार पुस केल्यावर तीने सांगितले की, मी गर्भलिंग निदानासाठी आले होते आणि तिने लिंग सुध्दा सांगितले आहे. तिथे असलेल्या डॉक्टरने सुध्दा मान्य केले आहे. तिथे थोडा गोंधळ व्हायला लागला होता. उस्मानपुरा पोलिस स्टेशन मधुन पोलिस फोर्स मागुन घेतले होते. संध्याकाळी पंचनामा झाल्या नंतर ती मशिन आणि पुर्ण साहित्य सिल करण्यात आले. महिलेने सोनोग्राफी करण्यासाठी पंधरा हजार रुपये त्या एजंटला दिले होते. एजंटला विचारल्यावर सुरुवातीला त्याने नकार दिला जास्त खोलात विचारल्यावर पंधरा हजार रु. दिले असे त्याने कबुल केले. ते पंधरा हजार रुपये सुध्दा सिल करुन घेतले. रात्री या सगळ्यांसोबत उस्मानपुरा पोलिस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल केला. नोंदणी करुन सगळे साहित्य त्यांच्याकडे देण्यात आले. हा तपास वरच्या स्थरावर करण्यात येणार आहे. जवाहर नगर पोलिस स्टेशनचे असिस्टंट एपीआय हे याचा तपास करत आहे. याची पुर्ण रेकॉर्डींग केलेली आहे. संपुर्ण पुरावे आपल्याकडे आहे. पोलिसा मार्फत कारवाई चालु आहे. पाच जणांना पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

श्री.गजानन बारवाल : मागील सभेमधील विषय क्र.१९४ मध्ये दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सदर प्रस्ताव अनावधानाने मंजूर करण्यांत आलेला आहे. श्री.भाऊसाहेब रूंजाजी कांबळे, यांनी मालमत्ता कर व पाणीपट्टी मनपा फंडात जमा न करता रकमेचा अपहार केलेला आहे. त्यामुळे त्यांना बडतर्फ करणे योग्य होईल, संबंधीताने स्थायी समिती सभेकडे सादर केलेले अपील फेटाळण्यात यावे, अशी दुरूस्ती करण्यांत यावी.

मा.सभापती : मागील दिनांक २४/०१/२०१९ च्या स्थायी समितीच्या सभेमधील विषय क्र.१९४ अनावधानाने मंजूर करण्यांत आलेला आहे. श्री.भाऊसाहेब रूंजाजी कांबळे यांनी अपहार केलेला असल्यामुळे व खाते चौकशीमध्ये सुध्दा ते दोषी आढळले. त्यामुळे त्यांना प्रशासनाने सक्तीने सेवानिवृत्त केलेले आहे. आताच स.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार श्री.भाऊसाहेब रूंजाजी कांबळे, पाणी पुरवठा मजूर यांना बडतर्फ करण्यांत येत आहे. तसेच त्यांनी स्थायी समिती सभेकडे सादर केलेले अपील फेटाळण्यात येत आहे. यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, प्रशासनाने स्थायी समितीच्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

श्रीमती.राखी देसरडा : किती सिमेंट रस्ते करणे आहेत. कॉंक्रीटकरण केल्या नंतर त्या रस्त्याची तपासणी केव्हा करणार. काही ठिकाणी सिमेंट रस्त्याचा थर निघुन अपघात होत आहे.

उप अभियंता : यात रस्त्याचे काम झाल्यानंतर १००,१५० mm कोर कटींग घेतो. इंजिनिअर कॉलेजच्या तज्ञ व्यक्ती तपासणी करणार प्रत्येक वेळेस टेस्टींग करतो. सॅम्पल घेतो गव्हरमेन्ट कॉलेजला तपासणीसाठी पाठवले.

श्रीमती.राखी देसरडा : मनपाच्या लॅब असाव्या त्यानंतर दुसरे लॅबला पाठवले पाहिजे. रिपोर्ट बरोबर असेल तरच पेमेंट दिले जावे.

उप अभियंता : प्रत्येक वेळी जास्त रिपोर्ट येईल त्या प्रमाणे टप्प्या टप्प्याने पेमेंट देतो.

मा.सभापती : स.सदस्यांनी केलेल्या सुचनेचा विचार करावा त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०९ :**

दिनांक १४/०१/२०१९ रोजी (का.प.क्र.१९) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

मा.सभापती : विषय क्र.२०९ मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

दिनांक १४/०१/२०१९ रोजी (का.प.क्र.१९) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. २१० :**

विषय : प्रभाग क्र.७१,क्रांतीनगर अंतर्गत चुन्नीलाल पेट्रोलपंप ते वन विभाग कार्यालय पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे या कामाचे ठेकेदार श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग गुरूदत्ते, यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.८० टक्के कमी दराने म्हणजेच निविदा र.रू.३९,२२,५७४/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : निविदा दि.२२/०३/२०१८

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.०९ |
| २ | कामाचे स्वरुप | रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | ३९,९४,४७५/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ३९,९४,४७५/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | १४ मार्च २०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २२ मार्च २०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०२ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग गुरूदत्ते | ३९,२२,५७४/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.८० टक्के कमी दराने |
| ०२. | श्री.सुधाकर पवार | ३९,९४,४३५/- | अंदाजपत्रकीय दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभा दि.०७/०२/२०१८ विषय क्र.२८० |
| तरी विषयाकिंत काम ठेकेदार श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग गुरूदत्ते यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.८० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.३९,२२,५७४/- पर्यंत करून घेणेचा व करार करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. | | |

मा.सभापती : विषय क्र.२१० मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७१, क्रांतीनगर अंतर्गत चुन्नीलाल पेट्रोलपंप ते वन विभाग कार्यालय पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग गुरूदत्ते, यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.८० टक्के कमी दराने म्हणजेच निविदा र.रू.३९,२२,५७४/- पर्यंत काम करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २११ :</u>**

विषय : वार्ड क्र.३८ एमआयडीसी चिकलठाणा येथील लिपी बॉयलर कंपनी ते सीटीआर कंपनी ते डब्ल्यु सेक्टर ते मेमन फर्नेस व मसनतपुर मेन रोड ते शक्ती टाईल्स शहानगर येथील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामाचे ठेकेदार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.४९ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.२,८२,४५,५९७.५०/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्रमांक /Tender ID- 2018-AMCA-339503-1

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.०५, सिडको |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.३८ एमआयडीसी चिकलठाणा येथील लिपी बॉयलर कंपनी ते सीटीआर कंपनी ते डब्ल्यु सेक्टर ते मेमन फर्नेस व मसनतपुर मेन रोड ते शक्ती टाईल्स शहानगर येथील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.सर्वसाधारण सभा दिनांक १९/०३/२०१८ विषय क्र.३५५ र.रू.२,९८,०४,३५६/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.२,८३,८५,१००/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | दै.शासन सम्राट दि.०७/०८/२०१८<br>दै.लोकमत दि.०७/०८/२०१८ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २९ ऑगस्ट २०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ३१ ऑगस्ट २०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | तीन (०३) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त (B2 Tender) |
|---|---|---|---|
| ०१. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | र.रू.२८२४५५९७.५० | अं.प.दरापेक्षा ०.४९ टक्के कमी |
| ०२. | मे.चार्निया कन्स्ट्रक्शन | र.रू.२८४३८८३९.३८ | अं.प.दरापेक्षा ०.१८९३२ टक्के जास्त |
| ०३. | मे.काकाजी बंडुजी पाथ्रीकर | र.रू.२८६४८६९९.३८ | अं.प.दरापेक्षा ०.९८२६५ टक्के जास्त |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | शहर एकात्मिक रस्ते विकास |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | आहे. |
| तरी विषयांकित काम ठेकेदार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.४९ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.२,८२,४५,५९७.५०/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

मा.सभापती :विषय क्र.२११ मंजुर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३८ एमआयडीसी चिकलठाणा येथील लिपी बॉयलर कंपनी ते सीटीआर कंपनी ते डब्ल्यु सेक्टर ते मेमन फर्नेस व मसनतपुर मेन रोड ते शक्ती टाईल्स शहानगर येथील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.४९ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.२,८२,४५,५९७.५०/- पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

**<u>विषय क्र. २१२ :</u>**

विषय : झोन क्र.८ वार्ड क्र.१०७ अंतर्गत नाथ व्हॅली रोडवर आनंद विहार पर्यंत डी.आय.के.-७ जलवाहीनी टाकणे बाबत.

संदर्भ : Tender ID- 2018-AMCA-341885-2

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) |
| २ | कामाचे स्वरुप | पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी जलवाहीनी टाकणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, रूपये २४,९५,३६५/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रूपये २४,९५,३६५/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | www.mahatenders.gov.in<br>04/10/2018 |

| | | |
|---|---|---|
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | १९/१०/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १९/१०/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | तीन (०३) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.शेख आसीफ शेख आरीफ | ३४,९३,५११/- | ४० टक्के जास्त दराने |
| ०२. | मे.नुर कन्स्ट्रक्शन | ३६,१८,२८०/- | ४५ टक्के जास्त दराने |
| ०३. | श्री.एकनाथ एस. भाले | ३६,९३,१४१/- | ४८ टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | बाजारात डी.आय.के.-७ पाईपचे वाढीव दर पहाता सीएमआर दराने आलेले दर. --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे जी.बी.आर. अंदाजपत्रक २०१८-१९ |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | --- |

तरी विषयांकित कामासाठी दुसऱ्या वेळेस मागविलेल्या ई-निविदे अंतर्गत तीन निविदा प्राप्त झालेल्या असून त्यापैकी सर्वात कमी दराची (एल-१) सक्षम ठेकेदार श्री.शेख आसीफ शेख आरीफ यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४० टक्के जास्त दराची निविदा प्राप्त आहे. बाजारात डी.आय.के.-७ पाईपचे असलेले वाढीव दर पाहता पाईप करीता सी.एम.आर. दराने व इतर बाबींकरीता मजीप्रा दरसुची सन २०१८-१९ नुसार या कामाच्या निविदेचे मुल्यांकन केले असता दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.३९ टक्के जास्त येतात. या संदर्भाने दर निश्चितीकरण समिती समोर दराबाबत वाटाघाटी होऊन कंत्राटदार श्री.शेख आसीफ शेख आरीफ यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४० टक्के जास्त दरा ऐवजी ३६.३९ टक्के जास्त दराने काम करण्यास लेखी सहमती दिलेली आहे. तरी सक्षम ठेकेदार श्री.शेख आसीफ शेख आरीफ यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.३९ टक्के जास्त म्हणजेच र.रू.३४,०३,४२८/- पर्यंत काम करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

मा.सभापती :ऐनवेळचा विषय क्र.२१२ मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.८ वार्ड क्र.१०७ अंतर्गत नाथ व्हॅली रोडवर आनंद विहार पर्यंत डी.आय.के.-७ जलवाहीनी टाकणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४० टक्के जास्त दराचे निविदाधारक ठेकेदार श्री.शेख आसीफ शेख आरीफ यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून ४० टक्के जास्त दरा ऐवजी ३६.३९ टक्के जास्त दराने म्हणजेच र.रू.३४,०३,४२८/- पर्यंत काम करून घेण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१३ :**

**आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९९ अन्वये महानगरपालिकेने स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेवुन फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक आहे.**

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचेच दर कायम करण्यात आले होते. सन २०१२-१३ ते मागील वर्षापर्यंत कोणतीही कर वाढ करण्यात आलेली नाही. सन २०१९-२०२० मध्ये कर आकारणी करणेसाठी पूर्वीप्रमाणेच खालील निवासी, निवासेत्तर, व्यावसायीक व औद्योगीक, शैक्षणिक संस्था, भारत सरकारच्या मिळकती, मोबाईल टॉवर्स असे गट करण्यात आलेले आहे. ते पुढील प्रमाणे,

०१. निवासी :- राहते घर, -माहिती तंत्रज्ञान वापरासाठी असलेल्या इमारती. (महाराष्ट्र शासनाचे औद्योगीक धोरण परिपत्रक क्र.शासन निर्णय आयटीपी-०३/सीआर-३९११/आयएनडी-७, दिनांक १२-७-२००३ अन्वये माहिती व माहिती तंत्रज्ञान यासाठी मिळकतींचा वापर असल्यास त्यांच्या करात सवलत देणेसाठी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, महाराष्ट्र शासन यांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.) धर्मादाय संस्था, स्वंयसेवी संस्था, सेवाभावी संस्था.

०२. निवासेत्तर :- वकीलाचे कार्यालये, कर सल्लागारांचे खाजगी कार्यालये, शैक्षणिक संस्थेशी संलग्न असलेली वस्तीगृहे, स्वतंत्र वस्तीगृहे.

०३. व्यावसायीक :- पेट्रोलपंप व त्यास संलग्न असलेली खुली जागा, व्यावसायीक दराने खुल्या जागेचे दर वेगळे आकारले जाईल. हॉटेल्स, लॉन्स (लग्न, समारंभासाठी वापरात येणारे लॉन्स) व्यावसायीक वापरासाठी मोकळया जागा, मॉल्स, सर्व प्रकारची दुकाने व शासकीय कार्यालये, डॉक्टरांचे क्लिनीक, खाजगी हॉस्पीटल्स्, कमर्शीयल पेड पार्कींगसाठी व्यावसायीक दराने कर आकारण्यात येईल. तसेच ज्या इमारती व्यावसायीक वापरासाठी भाड्याने दिल्या असतील अशा इमारतीनां सुध्दा व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल. धार्मिक स्थळाच्या जागेवर जर व्यावसायीक वापर होत असेल तर त्यास व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल.

०४. शैक्षणिक संस्था :- अ) ज्या शैक्षणिक संस्था अनुदानित आहेत. अशा शैक्षणिक संस्थांना सामान्य कर ३० टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल.

ब) ज्या शैक्षणिक संस्था विनाअनुदानित आहेत, इंजिनियरींग कॉलेज, मेडीकल कॉलेज अशा शैक्षणिक संस्थांना सामान्य कर ३७.५ टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल.

०५. भारत सरकारच्या मिळकती :- मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार भारत सरकार व त्यांच्या अंगीकृत असलेली कार्यालये व इतर मिळकती यांना वापरानुसार कर आकारणी करून त्यांना महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या सुविधानुसार एकूण कराच्या ७५ टक्के, ५० टक्के व ३३.३३ टक्के रक्कम सेवा शुल्क म्हणून वसूल करण्यात येईल.

०६. मोबाईल टॉवर्स :- टॉवरसाठी भाडयाने घेतलेल्या इमारतीतील जागेचे प्रती माह भाडे नुसार किंवा भाडेपट्टा करारनामानुसार यापैकी जे जास्तीचे असेल त्याप्रमाणे कर आकारण्यात येईल. तसेच बी.एस.एन.एल. व इतर दूर संचार कंपनीचे स्वतःच्या जागेत मोबाईल टॉवर असल्यास अशा मोबाईल टॉवरला तळाचे क्षेत्रफळानुसार रू.९००/- प्रती चौ.मी. प्रती महा दरानुसार कर आकारणी करण्यात येईल. तसेच अनाधिकृत टॉवर्सला मालमत्ता कराची दुप्पट शास्ती लागु राहील.

०७. औद्योगीक :- एम.आय.डी.सी., औद्योगीक क्षेत्र इत्यादी.

वरील संज्ञेत मोडत असलेल्या मालमत्तेस सामान्य कराचा दर खालील प्रमाणे राहील.

०८. सामान्य करा बाबतचा तक्ता :-

| सामान्य कराचा प्रकार वापराप्रमाणे | सध्याचे सामान्य कराचे दर | प्रस्तावित सामान्य कराचे दर |
|---|---|---|
| १. निवासी (उपरोक्त प्रमाणे) | ३०% | ३०% |
| २. निवासेत्तर (उपरोक्त प्रमाणे) | ३७.५% | ३७.५% |
| ३. व्यावसायीक (उपरोक्त प्रमाणे) | ४५% | ४५% |
| ४. औद्योगीक (उपरोक्त प्रमाणे) | ३६% | ३६% |
| ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |
| ६. विना अनुदानित शैक्षणिक संस्था | ३७.५% | ३७.५% |

०९. उपभोक्ता कर :-

घनकचरा व्यवस्थापणेसाठी लागणारा खर्च शहरातील सर्व मिळकत धारकांकडुन उपभोक्ता कर म्हणुन वसुल करण्यासाठी खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

०१ निवासी वापराच्या मिळकतीस रू.१००/- उपभोक्ता कर आकारण्यात येईल.

०२ निवासेत्तर, व्यावसायीक, शैक्षणिक, औद्योगिक वापराच्या मिळकतीस रू.५००/- उपभोक्ता कर आकारण्यात येईल.

१०. नामांतर शुल्क :-

खरेदी विक्री आधारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या दस्त / कागदपत्र आधारे नामांतर शुल्क कर योग्य मुल्यावर खालील प्रमाणे आकारण्यात येतील.

| निवासी व व्यावसायीक कर योग्य मुल्य | नामांतर शुल्क | |
|---|---|---|
| | (शहर, सिडको व औद्योगिक भागातील निवासी मिळकतींसाठी) | (शहर, सिडको भागातील व्यावसायीक मिळकतींसाठी) |
| रू. ०१ ते १०,०००/- | रू.१५००/- | रू.३०००/- |
| रू. १०,००१/- ते ५०,०००/- | रू.४५००/- | रू.९०००/- |
| रू. ५०,००१/- ते पुढे | रू.९०००/- | रू.१८,०००/- |
| औद्योगिक वसाहतीतील व्यावसायीक मिळकतींसाठी | | |
| रू.०१ ते ५०,०००/- | | रू.१८,०००/- |
| रू.५०,००१ ते १,००,०००/- | | रू.३०,०००/- |
| रू.१,००,०००/- च्या पुढे | | रू.७५,०००/- |

११. अदत्त रकमेवरील शास्ती :-

चालु मागणीचे बिल प्राप्त झाल्यानंतर अशा बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रथम सहामाही देयकाची रक्कम ३० जुन पूर्वी व द्वितीय सहामाही देयकाची रक्कम ३१ डिसेंबर पूर्वी भरणे बंधनकारक आहे. जर कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर अशा अद्त रकमेबद्दल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण-८ कराधान नियम ४१ अन्वये प्रत्येक महिन्यासाठी कराच्या २ टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणून द्यावी लागेल.

११.१ अवैध इमारतीवर शास्ती बसविणे :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २६७ (अ) नुसार दि.०१-०४-२००८ पासनु अवैध इमारतीवर शास्ती आकारण्यात येते.

उक्त नियमान्वये कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरीत्या बांधकाम करील किंवा पुर्नर बांधकाम करील, तो, अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरूध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता, ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी, अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल तथापी,

शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.३०५/नवि-२०, मंत्रालय मुंबई, दिनांक ११ जानेवारी २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनाधिकृत निवासी बांधकामासाठी शासनाने शास्तीची आकारणी खालील प्रमाणे करणे बाबत निर्देश दिलेले आहे.

| अ.क्र. | निवासी बांधकामाचे क्षेत्रफळ | आकारण्याच्या शास्तीवर दर |
|---|---|---|
| १. | ६०० चौ. फुटापर्यतचे निवासी बांधकाम | शास्तीची आकारणी करण्यात येऊ नये |
| २. | ६०१ ते १००० चौ. फुटापर्यतचे निवासी बांधकाम | प्रती वर्षी मालमत्ता कराच्या ५० टक्के दराने शास्ती आकारण्यात यावी. |
| ३. | १००१ चौ. फुटापुढील निवासी बांधकाम | प्रती वर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात यावी (सध्याच्या दाराने) |

परंतु, असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे, यांचा असे अवैध बांधकाम किंवा पुर्नर बांधकाम, ते अस्तित्वात असे तो पर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुर्नर बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही, मग असा कालावधी कितीही असो.

(२) पोट कलम (१) अन्वये देय असलेली शास्ती ही, जणू काही शास्तीची रक्कम ही अशा व्यक्तीकडून देय असलेली मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये निर्धारीत करण्यात येते, करिता सदर शासन निर्णय प्रमाणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

१२. <u>विशेष सवलती</u> :-

१२.१ पाच वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्यास वार्षीक कराच्या सामान्य करात दोन वर्षाची सूट देण्यात येईल.

१२.२ तीन वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्या एक वर्षातील वार्षीक कराच्या सामान्य करात ५०% सूट देण्यात येईल.

१२.३ जे मालमत्ताधारक चालु वर्षाचा खालील महिन्यात मालमत्ता कर भरणा करतील त्यांना सन २०१९-२० करीता सामान्य करात पुढील प्रमाणे सूट देय राहील.

| | |
|---|---|
| एप्रिल | १०% |
| मे | ८% |
| जुन | ६% |

जुलै ते मार्च पर्यंतच्या कालावधीत चालु आर्थिक वर्षातील मागणीवर तसेच थकबाकीवर सूट देय राहणार नाही.

१२.४. आजी / माजी सैनिकांना व स्वातंत्र्य सैनिकांना व त्यांच्या पत्नीच्या नांवे असलेल्या मिळकतीस मागील वर्षाप्रमाणेच सन २०१९-२० या आर्थिक वर्षात देखील निवासी वापर करीत असलेल्या केवळ एका मिळकतीस सामान्य करात १००% सूट दिली जाईल.

१२.५ जे मालमत्ताधारक आपल्या मिळकतीत सोलर सिस्टीम लावतील त्यांना सामान्य करात चालु वर्षात ५% सुट दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

१२.६ जे मालमत्ताधारक आपल्या मालमत्तेस रेन हार्वेस्टींग सिस्टीम (Rain Harvesting System) लागु करतील, अशा मालमत्ताधारकास सामान्य करात २५% सवलत दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

१२.७ जे मिळकतधारक नेट बॅकींग, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्डव्दारे ऑन-लाईन मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना अशा मिळकतधारकांना चालु आर्थिक वर्षातील मालमत्ता कराच्या सामान्य करात ५% सूट देय राहील.

१३. <u>कर आकारणी प्रणाली</u> :-

औरंगाबाद शहराचे वेगवेगळे भाग पाडुन त्याभागातील मिळकतीच्या / जागेचा मुल्यानुसार त्यांचे वाजवी भाडे आकारणी करण्यासाठी विचारात घेण्यात येते. अशा प्रकारचे भाग पाडुन मुल्यांकन हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणका मधील निवासी जागांच्या किमंती विचारात घेवुन औरंगाबाद शहराचे खालील प्रमाणे भाग करणे योग्य होईल. यामुळे औरंगाबाद शहरातील वेगवेगळया भागातील मूल्य (जागेचे) वेगवेगळे मिळवुन त्यानुसार मिळकतीचा स्तर (वर्गीकरण) होवुन त्यानुसार मालमत्ता कर आकारणीसाठी दर आकारणे योग्य राहील.

१३.१ सन २०१० चे महाराष्ट्र शासनाकडील सिध्द शिघ्र गणक (Ready Recknor) आधारे दिनांक ०१-०४-२०१० पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील सर्व मिळकतीसाठी चार विभाग हे मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.९८५ दि.२०-२-२०१० नुसार पूर्वी प्रमाणेच करण्यात आलेले होते. त्यानुसार सन २०१२ मध्ये देखील चार भाग करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने सन २०१६ साठी शिघ्र शिध्द गणकाचे दर शासनातर्फे प्रसिध्द झाल्याने सन २०१५ मधील सिध्द शिघ्र गणकातील दरानुसार अ, ब, क, व ड असे चार भाग होतात. खालील कोणत्या भागात कोणती मिळकत येते, हे तपासता येईल. तसेच दरवर्षी दर बदलले तरी कर आकारणीसाठी हे विभाग पुढील चार वर्षासाठी असेच ठेवण्यात येतील.

| अ.क्र. | विभाग | सन २०१२ च्या विभागानुसार मिळकतीचा सन २०१६-१७ पर्यंतचा प्रचलित दर प्रती चौ.मी. | सन २०१६ च्या विभागानुसार सन २०१७-१८ करीता प्रस्तावित मिळकतीचा दर प्रती चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | अ | रू.१७,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती | रू.४५,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती |
| २ | ब | रू.१३,००० ते रू.१६,९९९/- | रू.३४,९०० ते रू.४४,९९९/- |
| ३ | क | रू.११,००० ते रू.९,९९९/- | रू.३१,७९९ ते रू.३४,८९९/- |
| ४ | ड | रू.८५०० ते रू.१०,९९९/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) | रू.२५,००० ते ३१,८००/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) |

वरील प्रस्तावित दर हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणकामधील घेण्यात आलेले आहे. सदरील दर सन २०१९-२० साठी कायम ठेवण्यात यावेत.

१४. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये कर योग्य मुल्य निश्चित करणेकरीता खालील प्रमाणे वर्गीकरणानुसार व सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे आहेत. :-

## निवासी इमारत

१४.१ निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. सन २०१८-१९ चे आस्तीत्वातील दर सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- | रू.६/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.९/- | रू.८/- | रू.७/- | रू.५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.८/- | रू.३/- | रू.२/- | रू.१/- |

## निवासेतर इमारत

१४.२ (अ) सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. आस्तीत्वातील दर सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२२/- | रू.२०/- | रू.१८/- | रू.१७/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.७/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३/- | रू.६/- | रू.३/- | रू.२/- |

## अनुदानीत शैक्षणिक संस्था

१४.३ (ब) सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. आस्तीत्वातील दर सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१३/- | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१२/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.११/- | रू.९/- | रू.८/- | रू.७/- |

## कायम विना अनुदानीत संस्था

**१४.४ (क) सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. आस्तीत्वातील दर सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७/- | रू.१५/- | रू.१४/- | रू.१३/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६/- | रू.१४/- | रू.१३/- | रू.१२/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१३/- | रू.१२/- | रू.११/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |

## <u>व्यावसायीक इमारती</u>

**१४.५ सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. आस्तीत्वातील दर सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२८/- | रू.२६/- | रू.२४/- | रू.२२/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२४/- | रू.२२/- | रू.१९/- | रू.१७/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२०/- | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.१०/- |

**१४.६ औद्योगिक क्षेत्रासाठी दर :-**

| अ.क्र. | बांधकामाचा वर्ग | सन २०१८-१९ साठी आस्तीत्वातील दर सन २०१९-२० साठी कायम करण्यात यावे |
|---|---|---|
| | | चौ.मी. |
| १ | कारखाना कार्यालय (आर.सी.सी.) | १४.६४ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | १०.३२ |
| | कारखाना कार्यशाळा (आर.सी.सी.) | ११.६२ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | ९.०४ |
| २ | कारखाना परिसरातील कॅन्टीन | २४.०० |
| ३ | गोदाम (आर.सी.सी.) | ९.६८ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ९.६८ |
| | अर्ध पक्के | ५.८२ |
| | कच्चे आणि विना छताचे | ३.२२ |
| ४ | शेड | २.५८ |
| ५ | सायकल स्टॅन्ड | ३.८६ |
| ६ | मशिनरी प्लॅन्ट (आर.सी.सी.) | ११.४० |

| | | |
|---|---|---|
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ८.८२ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ७.१० |
| | कच्चे बांधकाम | ३.१० |
| ७ | निवासी क्षेत्र (आर.सी.सी.) | १६.१४ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | १२.९२ |
| | अर्धे पक्के बांधकाम | ११.४० |
| | कच्चे बांधकाम | ६.४४ |
| ८ | सहान जागा | |
| | कारखाना वापर | १२.०४ |
| | रिकामे | ९.०३ |

१४.७ सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणी करीता प्रती माह प्रती चौ.मी. आस्तीत्वातील दर सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची आकारणी करीता खालील प्रमाणे प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.००/- | रू.२.५०/- | रू.२.००/- | रू.२/- |

१४.८ सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर / व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणी करीता प्रती माह प्रती चौ.मी. आस्तीत्वातील दर सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी निवासेतर / व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणी करीता खालील प्रमाणे प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१२.५०/- | रू.१०.५०/- | रू.९.००/- | रू.७/- |

**टिप :- मोकळ्या जागेची आकारणी करतांना फक्त सामान्य कर आकारण्यात येईल.**

**१५. मालमत्ता कर आकारणी करणेसाठी सन २०१८-२०१९ या वर्षाचे आस्तीत्वातील दर सन २०१९-२० कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे :-**

| अ.क्र. | कराचे नांव | कर योग्य मुल्य रूपये | सन २०१८-१९ चे आस्तीत्वातील दर सन २०१९-२० साठी कायम करण्यात यावे |
|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १. निवासी वापरासाठी | ३० % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | ३७.५% |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | ४५% |
| | | ४. औद्योगिक वापर | ३६% |
| | | ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% |
| | | ६. विना अनुदानित शै.संस्था | ३७.५% |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | साफसफाई कर | १. निवासी वापरासाठी | ३ % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | १० % |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | १० % |
| | | ४. औद्योगिक वापरासाठी | १०% |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १ % |
| ४ | अग्निशमन कर | | १.५ % |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २ % |
| ६ | पथकर | | २ % |
| ७ | जललाभ कर | | १.५ % |
| ८ | जलनिःसारण कर | | १.५ % |
| ९ | सेवरेज कर | १. निवासी वापरासाठी | १० % |
| | | २. निवासेत्तर व व्यावसायीक वापरासाठी | १५ % |
| | | ३. औद्योगिक वापरासाठी | ५ % |
| | | ४. औद्योगिक वसाहतीतील निवासी वापर | १० % |
| १० | उपभोक्ता कर | निवासी वापरासाठी | १०० प्रती वर्ष |
| | | निवासेतर / व्यावसायीक वापरासाठी | ५०० प्रती वर्ष |

१६ शासनाचे कर :- तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

वरील प्रमाणे सन २०१८-१९ चा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभे मध्ये ठेवला असता दि.१९-०३-२०१८ रोजीच्या सभेमध्ये सदरील प्रस्ताव अशंतः बदल करून विषय क्र. ३५२ नुसार खालील प्रमाणे ठराव घेण्यात आला.

०१. जे नागरीक ऑनलाईन मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना सामान्य करात १ टक्के सुट ऐवजी ५ टक्के सूट मान्य करण्यात येते.

०२. शैक्षणिक संस्थाचे बाबतीत मा. सर्वसाधारण सभेने पारित केलेला ठराव क्र.५१०/ई दि.०७-१२-२०१४ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

०३. आजी-माजी सैनिक व स्वातंत्र सैनिकांना व त्यांचे पत्नीचे नावे असलेले एका निवासी मिळकतीस मागील वर्षाप्रमाणेच सूट देय राहील व ही सूट संबधित मिळकतधारक ह्यात असे पर्यंत लागु राहील. त्यासाठी प्रत्येक वर्षी वार्ड कार्यालयाकडून मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

०४. समुहगृह योजना तसेच एकाच प्रकारचे फ्लॅट/ईमारती यांना या सर्व इमारतींना सारखाच मालमत्ता कर आकारण्यात यावा. एकाच योजनेत वेगवेगळ्या फ्लॅटधारकांना वेगवेगळी आकारणी करण्यात येवू नये.

व्यावसायीक इमारतीमध्ये ए.सी./प्लॉन्ट व मशीनरीची जागा असल्यास त्याचे कर योग्य मुल्य निवासी दराने करण्यात यावे.

व्यावसायीक इमारतीत इमारत मालक/भोगवटा वाहनतळाचा उपयोग व्यावसायीक स्वरूपात करत असेल तर अशा पार्कींग/वाहनतळास निवासेत्तर दराने कर आकारणीत करण्यात यावी. व त्यासाठी फक्त

**निवासेत्तर दराने (३७.५ टक्के) दराने सामान्य कर हा मालमत्ता कर म्हणून आकारण्यात यावा. त्यावर इतर कर आकारण्यात येवू नये.**

**प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणे अनाधिकृत वसाहती / गुंठेवारी क्षेत्र या भागातील मालमत्तांना चालु वर्षापासुन कर आकारणी करण्यात येते ती पुढील वर्षासाठी सुरू ठेवणे बाबत विचारार्थ.**

**सातारा-देवळाई हा भाग दि.१८-०१-२०१६ रोजी महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आला आहे या भागात पूर्वीच्या नगरपालिकेने, सिडको प्राधिकरणाने तसेच पुर्वीच्या ग्रामपंचायती कार्यालयामार्फत बांधकाम परवानगी दिलेल्या ग्राह्य धरून अधिकृत बांधकामाची कर आकारणी करण्याची प्रचलित पध्दती पुढील वर्षासाठी सुरू ठेवण्यासाठी विचारार्थ.**

**वादग्रस्त व व्यावसायीक प्रकरणामध्ये अतिरिक्त आयुक्त-१, कर निर्धारक व संकलक, सहा. कर निर्धारक व संकलक व संबंधित वार्ड अधिकारी, यांना प्रकरण** Out of court settelment **करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे.**

**काही प्रकरणात वाद निर्माण झाल्यास मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी घेतलेला निर्णय अंतिम राहतील.**

**दूहेरी नोंद/तिहेरी नोंद आढळल्यास ते रद्द करण्याचे अधिकार वार्ड अधिकारी यांना राहतील.**

**तसेच नामांतर प्रकरणे अंतिम करण्याचे अधिकार संबंधित वार्ड अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.**

**केंद्र शासनाचे इमारतींना सर्व्हीस चार्जची आकारणी मालमत्ता कराच्या ७५ टक्के ऐवजी ५० टक्के ३३ टक्के दराने आकारणीस मान्यता देण्यात येत आहे.**

**दि.१९-०३-२०१८ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.३५२ नुसार झालेला ठराव हा सन २०१९-२० साठी कायम करणे योग्य.**

**करिता, वरील प्रमाणे सन २०१९-२० साठी मालमत्ता कर आकारणी व वसूलीचे दराचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.**

श्री.गजानन बारवाल : मालमत्ता कर दरवाढीच्या प्रस्तावासंबंधी प्रशासनाचा खुलासा घेण्यात यावा.

सौ.शिल्पाराणी वाडकर : मालमत्ता करात कोणतीही दरवाढ केलेली नाही. हे योग्यच असून, जे नागरीक कर भरतात त्यांचेवरच बोजा पडतो. जे कर भरणा करीत नाही, त्यांचेकडूनही वसूली करण्यांत यावी. ज्या मिळकतीस कर लागलेला नाही, त्यांना कर आकारणी करण्यात यावी. व सर्व वसूली वाढविण्यात यावी.

मा.सभापती : श्री.पाटणी यांनी मालमत्ता कर दरवाढीच्या प्रस्तावासंबंधी खुलासा करावा.

कर संकलक व निर्धारक : मालमत्ता कर दरवाढी संबंधी कुठलीही दरवाढ सूचविण्यात आलेली नाही. मागील वर्षीचेच दर कायम ठेवण्यात आलेले आहेत.

मा.सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो. हा ठराव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९९ अन्वये फेब्रुवारी माहिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक असल्याने मालमत्ता कर दर निश्चितीचा प्रस्ताव प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेला आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे प्रशासनाने मागील वर्षीचेच कराचे दर सादर केलेले असल्यामुळे, सन २०१८-२०१९ साठी लागू असलेले दर हे सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षासाठीही लागू राहतील, असे सर्वानुमते ठरले. सदर ठराव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्र. २१४ :**

विषय : आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.८६ रामनगर अंतर्गत क्यु सेक्टर विठ्ठलनगर येथील खुल्या जागेत उद्यान विकसीत करणे या कामास दिनांक १०/०४/२०१७ रोजी मान्यता प्राप्त झाली होती. ई-निविदा प्रक्रियेद्वारे सदरील कामास ०६ जुलै-२०१७ ते ०४ ऑगस्ट २०१७ दरम्यान तीन वेळेस निविदा प्रक्रीया केली असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. पुन्हा चौथ्या वेळेस म्हणजे २२ ऑगस्ट २०१७ रोजी एक निविदा प्राप्त झाली होती ती २८ ऑगस्ट २०१७ रोजी उघडली असता सर्व तांत्रीक लिफाफे नियमानुसार प्राप्त झाले असून कामाचे ठेकेदार मे.सुमीत कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०० टक्के कमी दराने म्हणजेच रक्कम रू.४६,६६,३५४.९९ पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समिती मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : Tender ID- 2017-AMCA-222490-4

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | विभाग प्रमुख (उद्याने व प्राणी संग्रहालय) |
| २ | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.८६ रामनगर अंतर्गत क्यु सेक्टर विठ्ठलनगर येथील खुल्या जागेत उद्यान विकसीत करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे. मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.९२४ दिनांक १८/०२/२०१७ |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ४७६१५८६.७२ |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-निविदा सूचना पत्र दिनांक ०२/०५/२०१७<br>ई निविदा प्रसिध्दी प्रथम सूचना दिनांक ०३/०६/२०१७<br>ई निविदा प्रसिध्दी द्वितीय सूचना दिनांक ११/०७/२०१७<br>ई निविदा प्रसिध्दी तृतीय सूचना दिनांक २७/०७/२०१७<br>ई निविदा प्रसिध्दी चतुर्थ सूचना दिनांक ०८/०८/२०१७ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | १९/०८/२०१७ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २२/०८/२०१७ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | एक (०१) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.सुमीत कन्स्ट्रक्शन | ४७६१५८६.७२ | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०० टक्के कमी दराने (दोन टक्के कमी दराने) |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय?<br>असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही<br>नाही |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | प्रस्तावित कामाकरीता मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ९२४ दिनांक १८/०२/२०१७ नुसार मान्यता प्राप्त व शासन निर्णय क्रमांक जीईएन-२०१५/ प्र.क्र.८०/नगरविकास-१६ दि.१७ नोव्हेंबर २०१५ नुसार महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत विकास मध्ये प्राप्त निधी रू.५.०० कोटी मधून सदरील कामास रू.२५.०० लक्ष व शासन पुरस्कृत योजनेसाठी मनपा हिस्सा रू.१७.०० कोटी मधून रू.२५.०० लक्ष असे एकूण ५०.०० लक्षची तरतूद उपलब्ध झाली आहे. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली | नाही |

| | | |
|---|---|---|
| | आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | नाही |
| तरी विषयांकित काम ठेकेदार मे.सुमीत कन्स्ट्रक्शन यांचेकडून २.०० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.४६,६६,३५४.९९ पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

मा.सभापती : ऐनवेळचा विषय क्र.२१४ मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८६ रामनगर अंतर्गत क्यु सेक्टर विठ्ठलनगर येथील खुल्या जागेत उद्यान विकसीत करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार मे.सुमीत कन्स्ट्रक्शन यांचेकडून २.०० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.४६,६६,३५४.९९ पर्यंत काम करून घेण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपन्न झाल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद